# कामगार न्यायालय क्रं.२, औरंगाबाद
# श्री. एस.एस.सहस्त्रबुध्दे, न्यायाधीश यांचे न्यायालयात

डब्ल्यूसीए—सी क्रं.१२/२०२१ व
डब्ल्यूसीए—सी क्रं.३/२०२३

## <u>आदेश निशाणी यू—१ वर</u>

सदरचे दोन्ही प्रकरणे ही गैरअर्जदार क्रं.१ शेख सलीम, गैरअर्जदार क्रं. हिदायत व गैरअर्जदार क्रं.३ एचडीएफसी इरगो जनरल इन्शुरन्स यांच्या विरूध्द दाखल करण्यात आली आहेत. दोन्ही प्रकरणातील अर्जदाराचे कथन पाहता असे दिसून येते की, प्रकरणात अर्जदाराने मयत राजू रूंजाजी कांबळे हा गैरअर्जदार क्रं.१ शेख सलीम याच्या मालकीच्या ट्रक क्रं.एमएच—३८—डी—०१२२ या ट्रकवर चालक म्हणून असल्याचे कथन केले आहे. दोन्ही प्रकरणात ट्रकची पॉलिसी गैरअर्जदार क्रं.२ च्या नावे असल्याचे कथन करण्यात आले आहे. परंतू सदर इसम त्या ट्रकचा मालक आहे असा कोणताही उल्लेख दोन्ही प्रकरणात करण्यात आलेला नाही. इतकेच नाही तर दोन्ही प्रकरणात ट्रकचा चेसीस नंबर नमूद करण्यात आला नाही. दोन्ही प्रकरणे दाखल करताना दोन्ही पक्षकाराच्या वकीलानी ट्रकच्या आरटीओ रजिस्ट्रेशन संबंधीचे कागदपत्र परमिट, फिटनेस सर्टीफिकेट, इत्यादी कागदपत्रे दाखल करण्याचे कष्ट घेतल्याचे दिसून येत नाही.

डब्ल्यूसीए १२/२०२१ च्या अभिलेखाची पडताळणी केली असता असे दिसून येते की, त्या प्रकरणात अर्जदाराच्या वकीलानी इन्शुरन्स पॉलिसीची प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. सदर पॉलिसीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, ती पॉलिसी हिरो होंडा स्पलेंडर गाडीची असून वाहनाचा नोंदणी

क्रमांक एमएच—३८—डी—०१२२ असा असला तरी ते वाहन ट्रक नसून दुचाकी वाहन आहे. पॉलिसीची पाहणी केली असता असे दिसून येते की, एकूण प्रिमियम रू.८२८/— फक्त इतकेच स्वीकारण्यात आले आहे. त्यावर सरळ निष्कर्ष निघतो की, सदर पॉलिसी ट्रकची नसून दुचाकी वाहनाचीच आहे. हि वस्तू स्थिती पाहता दोन्ही प्रकरणातील अर्जदाराच्या वकीलाकडून त्याविषयीचा खुलासा मागविणे आवश्यक ठरते. त्यामुळेच मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आ दे श

दोन्ही प्रकरणातील अर्जदाराच्या वकीलानी वर उल्लेखीत बाबींबाबत खुलासा करावा तसेच मयत जो ट्रक चालवित होता त्या ट्रकचा चेसीस क्रमांक अभिलेखात नमूद करावा तसेच सदर ट्रकची आरटीओ रजिस्ट्रेशन पेपर्स, फिटनेस, परमीट, इ. कागदपत्रे दाखल करावीत जेणेकरून प्रकरण पुढे चालविणे शक्य होईल. दोन्ही प्रकरणातील अर्जदारानी याची नोंद घेवून पूर्तता करावी न केल्यास दोन्ही प्रकरणे खारीज करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

सही/—
दिनांक — २०/०८/२०२४ न्यायाधीश,
कामगार न्यायालय क्रं.२, औरंगाबाद.